# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट ३१२ - २३** **दिनांक : - १४/०९/२०२३**

## वाहन चोरी करणा-या सराईत गुन्हेगाराकडुन १७ गुन्हयांची उकल
## गुन्हे शाखा कक्ष- २ वसई यांची कामगीरी

आचोळे पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील फिर्यादी श्री दिपक मदनलाल शाह,वय ४५ वर्षे, धंदा मोटार ड्रायव्हीग स्कुल, रा. रुम नं. ई/१०६, ड्रीम एंजेल, फायरबिग्रेडजवळ, न्यु लिंक रोड, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जिल्हा पालघर यांनी दिनांक ३१/०८/२०२३ रोजी रात्री १०.०० वाजता ते दिनांक ०१/०९/२०२३ रोजी ०६.०० वाजताचे दरम्यान रो हाऊस नं.०१, नेमीनाथ नगर, आचोळे रोड, जया पॅलेस नालासोपारा पुर्व येथे सार्वजनिक रोडच्या कडेला उभी केलेली सिल्वर रंगाची वॅगनार कार क्रमांक एम.एच ४८ अे.डब्लु ९०१२ ही कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीने चोरुन नेल्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आचोळे पोलीस ठाण्यात गुन्हा रजि नं ४२३/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे हद्दिमध्ये सतत होणा-या वाहन चोरींचे प्रमाण वाढत असल्याने सदर वाहन चो-यांवर आळा घालणेबाबत मा. वरीष्ठांनी ओदशित केले होते. त्या अनुषंगाने घडणा-या प्रत्येक वाहन चोरीच्या गुन्हयाचे ठिकाणी प्रत्यक्ष भेट देवून घटनास्थळावरील सी सी टी व्ही फुटेजचे परीक्षण गुन्हे शाखा कक्ष -२ वसई यांचे मार्फतीने करण्यात येत होते. त्याप्रमाणे आचोळे पोलीस ठाणे ४२३/२०२३ भादविस कलम ३७९ प्रमाणे या वाहन चोरीच्या गुन्हयांतील चोरीस गेलेल्या व्हॅग्नार कारचे सी सी टी व्ही फुटेज माग काढत असताना सदरची व्हॅग्नार कार ही श्रीराम नगर, नालासोपारा पुर्व या ठिकाणी अपघातग्रस्त अवस्थेत सापडली. सदर अपघातग्रस्त वाहनाचे वाहन चालकाबाबत आजुबाजुस परीसरात तपास करता सदर आरोपीत ईसमास अपघातात कपाळास दुखापत झाल्याची माहीती प्राप्त झाली. जखमी आरोपीत हा उपचाराकरीता नमुद अपघाताचे परीसरात वैदयकिय उपचाराकरीता जाण्याची शक्यता जाणुन सदर ठिकाणचे रुग्णालयात तपास करता आरोपीत इसमाने साई हॉस्पिटल, धानीवबाग येथे दवाउपचार घेतल्याची माहीती प्राप्त करुन सापळा रचुन इसम नामे शादाब उर्फ बाबा उर्फ तावडे नौशाद शेख वय २३ वर्ष रा. रुम नं १५४, मेहबुबे रुबानी मशिदजवळ, भारतीय नगर, कुर्ला पश्चिम. सध्या रा. - गिता निवास चाळ रुम नं -६, हिराकुंज बिल्डींग जवळ, धानिवबाग नाका, वसई पुर्व यास ताब्यात घेण्यात आले.त्याचेकडे तपास केला असता त्याचा सदर गुन्हाचा सहभाग निष्पन्न झाल्याने वर नमुद गुन्हात त्यास अटक करण्यात आली असुन अटक आरोपीत याचेकडे अधिक तपास केला असता इकडील आयुक्तालयातील वाहन चोरीचे ११, घरफोडीचा १ , मोबाईल चोरीचा १ , इतर चोरीचा १ असे एकुण १४ गुन्हे व मुंबई पोली आयुक्तालयातील ३ गुन्हे उघडकीस आले आहेत.

**-: उघडकीस आलेले गुन्हे :-**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.रजी नं. व कलम |
|---|---|---|
| १. | आचोळे पोलीस ठाणे | ४२३/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे (मुळ गुन्हा ) |
| २. | पेल्हार पोलीस ठाणे | ७९४/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| ३. | पेल्हार पोलीस ठाणे | ८१८/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| ४. | पेल्हार पोलीस ठाणे | ८१९/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| ५. | पेल्हार पोलीस ठाणे | ८२०/२०२३ भा.द.वि.सं कलम ४५७, ३८० प्रमाणे |
| ६. | पेल्हार पोलीस ठाणे | ८३८/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| ७. | आचोळे पोलीस ठाणे | ३४०/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| ८. | आचोळे पोलीस ठाणे | ४०२/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| ९. | वालीव पोलीस ठाणे | ६६३/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| १०. | वालीव पोलीस ठाणे | ७३४/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| ११. | वालीव पोलीस ठाणे | ७४९/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| १२. | माणिकपुर पोलीस ठाणे | ३१९/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| १३. | वसई पोलीस ठाणे | ७४/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| १४. | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | ३०४/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| १५. | वडाला, मुंबई पोलीस ठार्णे | २४२/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| १६. | वनराई, मुंबई पोलीस ठार्णे | २०९/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| १७. | गोरेगाव, मुंबई पोलीस ठार्णे | ५६४/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |

अटक आरोपीत याचेकडुन उघडकीस आणलेल्या वाहन चोरी, घरफोडी आणि ईतर चोरीच्या एकुण १७ गुन्हयात १२ दुचाकी, २ चार चाकी, ४ मोबाईल व १ डुप्लीकेट चावी बनविण्याचा हॅंड व्हाईस व चाव्यांचा गुच्छा असा एकुण ५,९४,५००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

**अटक आरोपी विरुध्द विनोबा भावे नगर पोलीस ठाणे, मुंबई येथे एकुण ०७ गुन्हे दाखल आहेत.**

सदरची कारवाई मा. श्री अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. अमोल मांडवे सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, स.पो.नि. सुहास कांबळे, सागर शिंदे, स.फौ.संजय नवले, रमेश भोसले, पो.हवा. प्रफुल्ल पाटील, चंदन मोरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, रमेश आलदर, सुधीर नरळे, दादा आडके, पो.ना. प्रशांतकुमार ठाकुर, पो.अं. अमोल कोरे, सायबर शाखेचे स.फौ.संतोष चव्हाण, म.सु.ब. अविनाश चौधरी, रामेश्वर केकान यांनी केली आहे.

**----0000----**